# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. ५८९/जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ३/११/२०१८

## " मुलीकरीता स्वसंरक्षण शिबीराचे आयोजन"

**भंडारा:–** दिनांक ०२/११/२०१८ रोजी पोलीस बहुउद्देशीय सभागृह भंडारा येथे,भंडारा जिल्हा पोलीस दल व राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमानाने मा.पोलीस अधीक्षक विनीता साहू यांचे मार्गदर्शनात प्रमुख पाहुणे मा.श्री.शांन्तनु गोयल जिल्हाधिकारी, रश्मि नांदेडकर अपर पोलीस अधिक्षक,भंडारा,महिला आयोग सदस्या निता ठाकरे, समाज कल्याण विभाग सहायक आयुक्त कवाडे मॅडम, हे कार्यक्रमाला हजर होते. कार्यक्रमाची सुरवात दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

रश्मि नांदेडकर अपर पोलीस अधीक्षक यांनी अल्पवयीन मुलींना फुस लावुन पळवुन नेणे, किंवा किशोरवयीन मुली पळुन जाणे असे प्रकार वाढले आहेत. मुलींना स्वत:चे महत्व समजुन घ्या, स्त्री ही वापरुन घ्यायची वस्तु नाही. मुलींनी स्वत:च्या आयुष्यात स्वंयम केन्द्रीत राहुन उज्वल यश मिळवावे. मुलींनी स्वताचे ध्येय ठरवून ते पुर्ण करण्यासाठी आत्मनिर्भय होणे, सक्षम बना,अन्यायाचा प्रतीकार करायला शिका, अन्याय अत्याचार झाल्यास, पोलीस स्टेशनला तक्रार करा, तसेच फेसबुक व्हॉट्सअप,व्टिटर सारख्या सोशल मिडीया या आधुनीक तंत्र ज्ञानातुन फसवणुक होवु शकते, या तंत्राचा सुरक्षीत वापर करुन धोके ओळखावे.

यावेळी मा.श्री.शांन्तनु गोयल जिल्हाधिकारी भंडारा, यांनी आपले भाषणात वाईट स्पर्श,चांगला स्पर्श याबद्दल माहिती दिली तसेच मुलींना वाईट स्पर्श केला तर नाही म्हनायला शिका याबाबत माहिती दिली, प्रत्येक महिलांना स्वत:चे अधिकार जाणुन घ्यायला पाहीजे. याबाबत माहिती दिली.

यावेळी श्रीमती माधुरी थोरात शल्य चिकीत्सक जिल्हा सामाण्य रूग्नालय भंडारा,यांनी सांगीतले की, २२ टक्के किशोरवयीन मुलींचे कमी वयात लग्न होतात. माता मृत्यु दर प्रमाण जास्त आहे, मुला मुलीनमध्ये गुन्हयाचे प्रमाण वाढले आहे. मुलींनो अर्धा तास व्यायाम करा, मुलींची वाढ जशीजशी होत. असते त्याच्या मध्ये शरीर रचनेत बदल होतात. किशोरअवस्थेतील बदल तसेच भावनीक व सामजीक बदल याबद्दल माहिती दिली. पालकांनी तसेच शिक्षकांनी मुलींना योग्य मार्गदर्शन करावे. मुली चुकीच्या मार्गाने जावु नये कोणत्याही कारणाला बळी पडू नये, मुली डिप्रेशनला जातात व आत्महत्तेला बळी पडतात याकरीता पालकांनी लक्ष दयावे.

यावेळी महिला आयोग सदस्य निता ठाकरे, यांनी सांगीतले की, १८ वर्षाचे आतील मुलींना फुस लावुन पळवुन नेले जाते. मुलींनी कोणतेही समस्या असल्यास आपल्या पालकांना, शिक्षकांना सांगावे. तुम्हाला कोणी त्रास देत असल्यास तुम्ही स्वत: सक्षम बना असे सांगीतले.

समाज कल्याण विभाग सहायक आयुक्त कवाडे, यांनी सांगीतले की, मुलींनी स्वत: सक्षम व सृदृढ व्हावे.

श्री. स्वप्नील जाधव , परिवीक्षाधिन पोलीस उपअधीक्षक भंडारा यांनी सांगितले की,मुली पळुन जाण्याचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच त्यांनी सायबर गुन्हयाबद्दल, महिला विरुध्द घडणारे गुन्हे, इंटरनेटच्या माध्यमातुन घडणारे गुन्हे, सोशल मिडीया (फेसबुक व्हॉट्सअप, व्टिट्र) इ. वर घडणारे गुन्हे, विवाह विषयक फसवणुक, पाठलाग करणे इ. बद्दल माहिती दिली.

ॲडव्होकेट दुर्गा तलमले सहा. सरकारी अभियोक्ता सत्र न्यायालय भंडारा यांनी सांगितले की,मुलींनी आपल्या अभ्यासात लक्ष ठेवायला पाहीजे. १२, १४,१५, वर्षाच्या मुलीमध्ये विरूध्द् लींगी आर्कषण तयार होते. हया वयात शिक्षणाकडे लक्ष केंद्रीत केले पाहीजे. बाल लैगिक कायदा महिलान विषयक कायदे हे मुलीसाठी बनविण्यात आले आहे. लैगिक शोषण होवु नये याकरीता हे कायदे बनलेले आहे. या बाबत माहिती दिली.

सदर कार्यक्रमामध्ये महिला समाज, रॉयल पब्लीक स्कुल,महर्षि विदया मंदीर, नुतन कन्या विदयालय, महिला समाज विदयालय, बेसिक पब्लीक स्कुल,यामधिल शिक्षीका तसेच ३९० शाळकरी विदयार्थीनी कार्यक्रमाला उपस्थित होते. तसेच महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी कार्यक्रमाला उपस्थित होते त्याचप्रमाणे मुलीना विकास बागडे व पुनम सोरते यांनी कराटे यांचे माध्यमातुन मुलीना स्वता:चे रक्षण कसे करावे याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्याचप्रमाणे लघुपट दाखवुन मुलीना संरक्षणाबाबत माहीती देण्यात आली. कार्यक्रमाचे वैशाली केळकर महिला आयोगाच्या समंन्वय यांनी सुत्र संचालन व आभार प्रदर्शन केले.

(जितेद्रं के आडोळे)
**पोलीस उपनिरीक्षक**
**जनसंपर्क अधिकारी**
**संपर्क क. ९४०३१०९७२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता